यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक ४२२ २२२

ज्ञानगंगा अवतरली

दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३१७१६, २२३०२२७, २२३००५८ , ई-मेल : oae@ycmou.digitaluniversity.ac

जावक क्र : एसएक्स /परीक्षा कक्ष - /२०१७ दिनांक :- ११ जानेवारी २०१७

प्रति,
मा. केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजक,
य.च.म.मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र/परीक्षाकेंद्र

अत्यंत महत्त्वाचे

विषय - जानेवारी २०१७ परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबतच्या महत्वाच्या सूचना .....

मा. महोदय,

संगणकशास्त्र विद्याशाखेच्या संगणक व इंडस्ट्रीयल सायन्स मधील प्रमाणपत्र, पदविका तसेच पदवी शिक्षणक्रमांच्या प्रथम सत्रातील लॅब कोर्सेसची प्रात्यक्षिक परीक्षा २० जानेवारी ते २५ जानेवारी २०१७ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

सदर परीक्षेसाठी महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे :-

१. प्रात्यक्षिक परीक्षांसाठी १५ विद्यार्थ्यांची १ बॅच करावी (एका दिवसात जास्तीत जास्त ३ बॅचेस याप्रमाणे परीक्षेचे आयोजन करावे). अभ्यासकेंद्रांनी परीक्षेचे वेळापत्रक तयार करून त्याची एक प्रत त्वरीत उपकुलसचिव परीक्षा कक्ष - २ यांचेकडे पाठवावी.

२. प्रात्यक्षिक परीक्षेच्या अभ्यासक्रमनिहाय कोऱ्या उपस्थिती याद्या व गुणदान याद्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर आपल्या केंद्राच्या LOGIN मध्ये उपलब्ध आहेत. अभ्यासकेंद्रांनी सदर याद्या USER ID & PASSWORD वापरून वेबसाईटवरून डाऊनलोड करून घ्याव्यात.

३. प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी उपस्थिती यादीवर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

४. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी वरिष्ठ बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती विभागीय केंद्राकडून करण्यात येईल.

५. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या वरिष्ठ बहिस्थ परीक्षकांचे मानधन, प्रवास व दैनिक भत्ता विभागीय केंद्रामार्फत देण्यात येईल.

६. अंतर्गत परीक्षांचे (द्वितीय व तृतीय वर्षाच्या तसेच प्रथम वर्षातील चार थेअरी अभ्यासक्रमाच्या) गुणदान तक्ते व उपस्थिती याद्या तसेच लॅब कोर्सेसच्या २० ते २५ जानेवारी दरम्यान होणाऱ्या परीक्षांचे गुणदान तक्ते व उपस्थिती याद्या अंतर्गत व बहिस्थ परीक्षक व केंद्रप्रमुखांच्या स्वाक्षऱ्यांसह व केंद्राच्या शिक्क्यासह ०५ फेब्रुवारी २०१७ तारखेपर्यंत उपकुलसचिव,परीक्षा कक्ष - २ यांच्याकडे पाठवाव्यात. तत्पूर्वी हे गुण ऑनलाईन पद्धतीने दि. २० ते दि. ३० जानेवारी २०१७ दरम्यान विद्यापीठ संकेतस्थळावर भरणे अत्यावश्यक आहे.

७. ऑनलाईन पद्धतीने गुण भरताना अडचणी आल्यास श्री. आवेश कोकणी - ९०७५१७१४४२, श्री. प्रविण सुर्वे - ९४०३७७४६८६ यांच्याशी संपर्क साधावा.

मानधन देयक अदा करण्याबाबत सूचना -

१. मानधन दर तक्त्याप्रमाणे परीक्षा आयोजनामध्ये सहभागी व्यक्तीचे मानधन अदा करण्यात येईल. (परीक्षा मानधन देयक सोबत जोडली आहे.)
२. परीक्षा केंद्रसंयोजकाने मानधन देयक अदा केलेल्या व्यक्तींची देयकावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.
३. मानधन देयकावर Bank details घेणे (Bank Name, Branch, IFSC Code, Account No., PAN No.)
४. परीक्षा मानधन देयके पूर्ण करून विभागीय केंद्राकडे जमा करण्यात यावी.
५. विभागीय केंद्राद्वारे RTGS/CHEQUE ने मानधन रक्कम अदा करण्यात येईल.
६. ५ किंवा ५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या परीक्षा केंद्रावरील परीक्षेचा सर्व खर्च विद्यापीठ नियमानुसार परीक्षाकेंद्राने करावयाचा असून त्याची देयके विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावर जमा करावयाची आहेत.
७. ५ पेक्षा जास्त परंतु १० पेक्षा कमी विद्यार्थी असणाऱ्या परीक्षा केंद्रावरील बहिस्थ परीक्षकाचे मानधन विद्यापीठ देईल व उर्वरित सर्व खर्च विद्यापीठ नियमाप्रमाणे परीक्षाकेंद्राने करावयाचा असून त्याची देयके विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावर जमा करावयाची आहेत.

इतर सूचना -

१. आपल्या परीक्षाकेंद्रावर गैरप्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी व तशी सूचना परीक्षा कालावधीत नोटीस बोर्डावर लावण्यात यावी. तसेच परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.
२. आसनव्यवस्थे संदर्भात आवश्यक माहिती विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी बोर्डवर लिहिण्यात यावी.
३. परीक्षेसंदर्भात काही अडचणी असल्यास मुख्यालयाशी संपर्क साधावा (फोन नं. ०२५३-२२३००५८), श्री. माधव पळशीकर - ९४०३७७४५२३, श्री. राजू जगताप - ९४०३७७४६२१
४. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याबाबत विद्यार्थ्यांना कळवावे. लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठ नियमानुसार सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

(डॉ. अर्जुन घाटुळे)
परीक्षा नियंत्रक